ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख ४ फेब्रुवारी, १९५३ अंक ५

## विविध माहिती

**हिऱ्यांची टंचाई भासूं लागली**—निळसर पांढरी छटा असलेले हिरे सध्या पाहिजे तितके मिळत नाहींत, असें समजतें. ह्या प्रकारच्या हिऱ्यांना अतिपूर्वेकडील देशांत फार मागणी आहे. इकडील कांहीं देश कम्युनिस्ट बनल्यामुळें त्या देशांतील निर्वासित पैशाची गुंतवणूक म्हणून हिरे खरेदी करीत आहेत. त्यामुळें अशा तऱ्हेच्या हिऱ्यांची चणचण भासूं लागली आहे.

**जयपूर येथें रेडिओचें केंद्र**—राजस्थानची राजधानी जयपूर येथें पंचवार्षिक योजनेनुसार एक रेडिओचें केंद्र उघडण्यांत येणार आहे. त्याशिवाय जोधपूर येथेंही एक केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. तथापि, जयपूरचें केंद्र आधीं अस्तित्वांत येणार असल्यामुळें त्यासाठी योग्य अशी इमारत पहाण्याचें कामहि सुरू झालें आहे.

**चहा खुडण्यासाठी यंत्राचा उपयोग ?**—कलकत्ता येथील प्रिन्स ऑफ वेल्स टेक्निकल इन्स्टिट्यूटचे प्रिन्सिपॉल श्री. बारुआ ह्यांनीं आपल्या एका सहकाऱ्याच्या मदतीनें चहाचीं पानें खुडणारें यंत्र तयार केलें आहे. सदर यंत्राचा उपयोगहि करून पहाण्यांत आला. पण त्यांत कांहीं सुधारणा केल्याशिवाय तें वापरतां येण्यासारखें नाहीं असें समजतें.

**कृत्रिम तांदळाचा कारखाना**—भारतीय सरकार म्हैसूर येथें कृत्रिम तांदुळ तयार करण्याचा कारखाना उघडण्याच्या विचारांत आहे असें समजतें. म्हैसूर येथील अन्नविषयक प्रयोगशाळेचे चालक डॉ. सुब्रह्मण्यम् कारखान्याला योग्य असणारी यंत्रसामुग्री घेऊन येण्यासाठी परदेशीं रवाना झाले आहेत. दोन महिने हिंडून ते योग्य यंत्रसामुग्री कोणती, तें ठरवितील.

**अणु बाँबची चांचणी**—अमेरिकेंतील नेवाडा ह्या रेताड प्रदेशांत एक नकली शहर बांधण्यांत येत आहे. ह्या शहरासाठी पोलाद व सिमेंट ह्यांचा उपयोग करण्यांत येत असून एकूण खर्च ३,५०,००० डॉलर्स येईल. शहरावर अणुतोफांची सरबत्ती करण्यांत येईल आणि त्यांत ठेवलेल्या प्राण्यांवर काय परिणाम होईल तें व नुकसानी ह्यांचा अभ्यास करण्यांत येणार आहे. कोरिआंत कम्युनिस्टांनीं जशी भूमिगत तटबंदी बांधली आहे तशीच वरील शहरांत बांधण्यांत आली आहे.

**कार्डांमुळें सरकारचा तोटा**—भारतीय सरकारनें गरिबांना सुद्धा पत्रें पाठवितां यावीं म्हणून स्वस्त पोस्ट कार्डें काढलीं आहेत; पण त्यांच्यामुळें दरवर्षी १ कोटी रुपयांचा तोटा सरकारला सहन करावा लागतो. तरीही पोस्टाच्या कार्डांची किंमत वाढविण्याचा सरकारचा विचार नाहीं.

**विजेसाठीं प्राण्यांच्या शक्तीचा वापर**—गाझीपूर ( उत्तर प्रदेश ) येथील टेक्निकल इन्स्टिट्यूटनें प्राण्यांच्या शक्तीचा उपयोग करून वीज उत्पन्न करतां येईल अशा प्रकारचें एक यंत्र बनविल्याची वार्ता आहे. ह्या छोट्या यंत्राचा उपयोग करून गुंड्या तयार करण्यांत आल्या. यंत्र लोकप्रिय झाल्यास त्याचा खेड्यांत विशेष उपयोग होण्यासारखा आहे.

**झाला म्हणतात स्पर्धा**—उत्तर प्रदेश सरकारनें लखनौ येथें एक बाजार उघडला असून त्यांत मुख्यतः हस्तव्यवसायिकांनीं तयार केलेल्या कशिद्याच्या वस्तू मिळतात. कशिदा काढलेलीं पदकें आणि फिती अमेरिकन लष्कराला व नाविक दलाला पुरविण्यासाठीं उत्तर-प्रदेश सरकार आणि अमेरिका ह्यांच्यांत वाटाघाटी चालल्या होत्या. त्या जवळजवळ यशस्वी झाल्या होत्या. पण एका अमेरिकन कंपनीनें हा सौदा झाल्यास आपला धंदा बसेल म्हणून हरकत घेतल्यानें तो मोडला. २० लाख पदकें पुरविण्याचें कराराप्रमाणें ठरलें असतें.

**मुलांच्या पुस्तकांचें प्रदर्शन**—वॉशिंग्टन येथें मुलांच्या पुस्तकांचें प्रदर्शन नुकतेंच भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत पूर्वेकडील देशांपैकीं ५० देशांनीं आपलीं पुस्तकें पाठविलीं होतीं. भारत, पाकिस्तान, इजिप्त, इराण, इत्यादी देशांचीं पुस्तकें मांडण्यांत आलीं होतीं. श्रीमती शकुंतलादेवी ह्या लेखिकेनें मुलांसाठीं लिहिलेलें पंचतंत्र भारतानें पाठविलेल्या पुस्तकांत होतें.

**ब्रिटनचा मोटारींचा धंदा अडचणींत**—ब्रिटनमध्यें व परदेशीं बाजारपेठांत ब्रिटिश मोटारींना असणारी मागणी कमी झाल्यानें ब्रिटिश कारखानदार आपल्या कारखान्यांतील मजुरांच्या संख्येंत मोठ्या प्रमाणावर कपात करणार आहेत, असें समजतें. सुमारें वर्षापूर्वी प्रत्येक प्रकारच्या मोटारीला भरपूर मागणी होती. पण आतां विक्रेत्यांच्या शोभेच्या खिडक्यांतून १४,००० मोटारी गिऱ्हाइकांची वाट पहात आहेत. आतां फक्त लहान व स्वस्त मोटारींचीच विक्री होत आहे. सध्या मोटारींच्या विक्रीवर किरकोळ किंमतीच्या ६६$\frac{2}{3}$ टक्के खरेदी-कर आहे, तो मागें घेण्याची विनंति सरकारला करण्यांत येणार आहे.

**बँक ऑफ टोकिओची शाखा**—बँक ऑफ टोकिओ ह्या जपानी बँकेला कराची येथें आपली शाखा स्थापन करण्याची परवानगी पाकिस्तानच्या सरकारनें दिली आहे. इतरहि कांहीं जपानी बँकांकडून शाखा उघडण्यासाठीं परवानगी मागण्यांत आली होती, पण ती मिळाली नाहीं. गेल्या कांहीं महिन्यांत पाकिस्तान ब्रिटनपेक्षा जपानकडून अधिक माल घेऊं लागलें आहे. त्यामुळें अशा शाखेची आवश्यकता होती.

## खत तयार झालें, पण खपच बेताचा

सिंद्री येथें स्थापन करण्यांत आलेल्या खताच्या कारखान्या-पुढें आतां नव्याच अडचणी उभ्या राहिल्या आहेत. कारखान्याचें उत्पादन वाढत चाललें आहे. पण उत्पादित खताचा उठाव मात्र कमी होत चालला आहे. परिणाम असा झाला आहे कीं, कारखान्याच्या गुदामांत ६०,००० टन अमोनिअम सल्फेट पडून आहे. गुदामांत ९०,००० टनापेक्षा अधिक खत मावूं शकत नाहीं. साठलेल्या मालाचा उठाव लवकर न झाल्यास जानेवारी अखेर गुदाम संपूर्णपणें भरून जाईल. डिसेंबर, १९५२ मध्यें कारखान्यांत रोज ८०३ टन खत तयार होत असे. खप मात्र फारसा नव्हता. जानेवारी महिन्यांत कारखान्याची ८५ टक्के उत्पादनक्षमता वापरांत येऊं लागेल, आणि मार्चअखेर रोज, १,००० टन खत होऊं लागेल. पण त्याच्या उठावाची व्यवस्था काय? कारखान्याचें उत्पादन हळूहळू वाढविणेंच योग्य आहे. एरव्हीं नव्या यंत्रसामुग्रीवर वाजवीपेक्षा अधिक ताण पडेल आणि ती हाताळण्याचें शिक्षणहि नीट देतां येणार नाहीं. चालू मंदीमुळें कारखान्यांतील खताची किंमत ३५० रुपये टनाऐवजी ३१० रुपये टन इतकी उतरविण्यांत आली आहे. खताच्या उठावासंबंधींची व्यवस्था नीट नाहीं असें ध्वनित करण्यांत येत आहे. सरकारनें परदेशी खताची आयात थांबवावी असें सुचविण्यांत आलें आहे. खताच्या साठ्यामधून जे व्यापारी खत खरेदी करतात त्यांना पतीवर माल द्यावा अशीहि एक सूचना करण्यांत आली आहे. जपान भारतांत स्वस्त दरानें खत पुरवूं शकेल अशीहि एक वार्ता पसरलेली आहे. पण ती भरंवशाची वाटत नाहीं.

## रोगपरिहारार्थ संमोहन विद्येचा उपयोग

हिप्नॉटिझम अथवा संमोहन विद्येचा उपयोग रोगाच्या परिहारासाठी करावा किंवा नाहीं ह्याविषयीं तज्ज्ञांत बरेच मतभेद आहेत. पण ब्रिटनमधील रॉयल नॅशनल ऑर्थोपीडिक हॉस्पिटलमधील डॉ आर्वेन क्रेचर ह्यांनीं असा वापर करण्याला अनुकूल मत प्रदर्शित केलें आहे. डॉ. क्रेचर म्हणतात कीं, संमोहन विद्येकडे संशयानें पहाण्याचें डॉक्टर मंडळींनीं सोडून द्यावें. कारण त्या विद्येचा रोगपरिहारासाठी योग्य उपयोग करतां येणें शक्य आहे. डॉक्टर्सशीं सहकार्य करणाऱ्या कांहीं संमोहन-विद्या-विशारदांनीं सार्वजनिकरीत्या प्रयोग करून वरील गोष्ट सिद्ध केलेली आहे. ही विद्या फक्त त्यामधील विशारदालाच वापरतां येते असें नाहीं. एखाद्या रोग्यावर मोहिनी घातल्यानंतर दुसरी एखादी व्यक्तीही त्याला योग्य त्या सूचना देऊन कार्यभाग साधूं शकते. कांहीं शस्त्रक्रिया मोहिनी-विद्येच्या प्रभावानें यशस्वी रीत्या करतां येतात. मोठी आणि क्लेशकारक इंजेक्शन्ससुद्धा वरील विद्येच्या साह्यानें सुसह्य करतां येतात. शस्त्रक्रिया झाल्यावर रोग्याला पुष्कळदां खूपच दुःख सहन करावें लागतें, तेंहि मोहिनी विद्येनें बरेचसें शांत करता येतें. दांतदुखी व डोकेंदुखी हीं दोन दुखणींसुद्धा मोहिनीविद्येच्या कक्षेबाहेर नाहींत. अर्थात् ह्या दुखण्यांच्या बाबतींत त्यांचें मूळ कारण नाहींसें होतें असें मात्र नाहीं. लहान मुलें खारट-तुरट-कडवट औषधें घेतांना फार खळखळ करतात. पण त्यांच्या मनावर जर असें बिंबविण्यांत आलें कीं तें औषध नसून गोड पेय आहे, तर तीं अशीं औषधें अगदीं सहज घेतात. डॉ. क्रेचर ह्यांच्या मतानें मोहिनीविद्येचा उपयोग करून माणसाची स्मरणशक्तीसुद्धा वाढवितां येते. १७-१८ आंकडे असलेल्या संख्या प्रयोग केलेला माणूस सहज स्मरणशक्तींत साठवूं शकतो.

## जगांत टेलिफोन्सचा तुटवडा

आधुनिक जगांतील दैनंदिन व्यवहार चालविण्यासाठी टेलिफोन्सची अतिशय जरूर असते. पण अजूनहि जगांत गरजेच्या मानानें टेलिफोन्सची संख्या कमीच पडत आहे. ब्रिटनमध्यें तर टेलिफोन्सचा तुटवडा फारच जाणवत आहे टेलिफोनसाठी अर्ज करून कितीतरी वर्षे थांबलेले बरेच अर्जदार ब्रिटनमध्यें असून त्यांनीं आता असोसिएशन ऑफ टेलिफोन्स अप्लिकंट्स ह्या नांवाची एक संस्थाच स्थापन केली आहे. ब्रिटनमध्यें टेलिफोन्सचे वर्गणीदार ५७,७३,००० आहेत. तथापि अजून ४,६८,००० अर्जदारांचे अर्ज दप्तरीं पडून आहेत. गेल्या महायुद्धांत फ्रान्समधील टेलिफोन्सची अतिशय नासधूस झाली, आणि १९४५ सालीं तारांच्या आठ विभागांपैकीं फक्त एकच विभाग चालू होता. ह्यावर उपाय म्हणून लष्करी दळणवळण चालू ठेवणाऱ्या तारा आणि मुलकी विभागांच्या तारा ह्यांचें एकत्रीकरण करण्यांत आलें. त्यामुळें तुटवड्याची तीव्रता थोडीशी कमी झाली इतकेंच. कारण, फ्रान्समध्यें अजूनहि ६०,००० अर्जदार आपल्याला टेलिफोन्स कधीं मिळतील म्हणून आतुरतेनें वाट पहात आहेत. ह्या अर्जदारांपैकी दोनतृतीयांश अर्जदार पॅरीस शहरांतच आहेत. अमेरिकेंत टेलिफोन-कंपन्या ह्या खाजगी मालकीच्या आहेत. अशा अनेक कंपन्यांपैकी एकाच कंपनीच्या दप्तरीं ७,००,००० लोकांचे अर्ज पडून आहेत. अमेरिकेसारख्या समृद्ध देशांतहि टेलिफोन्सचा तुटवडा किती आहे तें वरील माहितीवरून दिसून येतें. पण ह्याच चित्राची दुसरी बाजू मोठी उद्‌बोधक आहे. ह्याच कंपनीचे युद्धाच्या अखेर २.२ कोटी वर्गणीदार होते. आतां त्यांची संख्या ३.९ कोटी झाली आहे. ह्यावरून अर्जदार व वर्गणीदार ह्यांची संख्या झपाट्यानें वाढत चालल्याचें दिसून येतें. भारतामधील प्रमुख शहरींहि अशीच टंचाई भासत आहे.

## अणुशक्तीच्या विकासासाठी कारखाने

भारताच्या ॲटॉमिक एनर्जी कमिशननें अणुशक्तीचा विकास करण्यासाठी चार वर्षांचा एक कार्यक्रम आंखला असून त्याला भारत सरकारची मान्यताहि मिळाली आहे. कार्यक्रमांत ठरविल्याप्रमाणें बिहार राज्यांत युरेनिअम शुद्ध करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याचे दोन भाग असून त्यांतील पहिला भाग मुंबईत उभारण्यांत येईल असें समजतें. मुंबईतील कारखान्यांत युरेनिअममिश्रित मातीपासून युरेनिअम आणि थोरिअम तयार करण्यांत येतील. त्या पुढील संस्करण छोटा नागपूर येथें उभारावयाच्या कारखान्यांत करण्यांत येईल. कमिशननें दुर्मिळ मातीच्या आढळासंबंधीं जें संशोधन केलें त्यावरून भारतांत युरेनिअम व थोरिअम बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सांपडण्यासारखें आहे असें दिसून आलें. बिहारमधील छोटा नागपूरमध्यें अशा प्रकारची माती आढळून आली आहे. कारखान्यांत तयार झालेल्या युरेनिअमचा उपयोग करून अणुशक्ति निर्माण करण्याचा छोटा कारखाना काढण्याचा सरकारचा विचार आहे. कारखान्याची जागा अद्याप ठरलेली नाहीं. परंतु तो पुण्याला निघण्याचा बराच संभव आहे. त्रावणकोर-कोचीन राज्यांत पं. नेहरू ह्यांच्या हस्तें मोनाझाइट वाळूवर संस्कार करणारा कारखाना नुकताच उघडण्यांत आला. अशा प्रकारचा हा पहिलाच कारखाना आहे. हे दोन्हीं कारखाने आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होतील. त्यांचा चालू खर्च गॅस मेंटलला लागणाऱ्या कांपाउंडसची विक्री करून भागविण्यांत येणार आहेत. अणुशक्तीच्या कारखान्यांचा उपयोग वैद्यकीय क्षेत्रांत आणि औद्योगिक शक्तीच्या क्षेत्रांत होण्यासारखा आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ४ फेब्रुवारी, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कॅनडांतील बँकिंग : शाखांचें महत्त्व

कॅनडामध्यें फक्त १२ बँका आहेत, त्यांच्या कॅनडामध्यें ३,८०७ व इतर देशांत ( मुख्यतः वेस्ट इंडीज, द. अमेरिका, यु. स्टेट्स, लंडन व पॅरिस येथें ) १०९ शाखा आहेत. कॅनडांतील बँकिंगचा विकास ब्रँच बँकिंग पद्धतीनें झाला आहे. कॅनडा हा देश मोठा असून, त्यांतील विभागांत मोसम व भौगोलिक परिस्थिति ह्यांत मोठें भिन्नत्व आढळतें. त्या देशाची शेती व उद्योगधंदे ह्यांची झपाट्यानें वाढ झाली आहे. ज्या ठिकाणीं स्थानिक ठेवी पुरेशा मिळणें अशक्य आहे, अशा ठिकाणींहि मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा होणें देशभर पुष्कळ शाखा असणाऱ्या थोड्या बँकांमुळें शक्य होतें. कारण, कांहीं केंद्रांत ठेवीच ज्यास्त येतात, त्या इतर गरजू ठिकाणीं गुंतवितां येतात. कॅनडांतील खेड्यामधील झोपडींतील लहानशी बँक–कचेरीसुद्धां मोठ्या शहरी बँकेइतकी विविध सेवा करूं शकते. स्थानिक परिस्थितीशीं स्थानिक बँक–मॅनेजरचा चांगला परिचय असल्याकारणानें, त्याला बँकेच्या मुख्य कचेरीच्या देखरेखीखालीं काम करावें लागलें, तरी त्याला बरीच मोकळीक मिळते. कॅनडांतील बँकांच्या एकूण कर्जांपैकीं ९०% कर्जें स्थानिक शाखा मॅनेजर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे विचारणा न करतां देतात, असा अंदाज आहे.

कॅनडाचें आर्थिक जीवन परराष्ट्रीय व्यापाराशीं बरेंच निगडित आहे. प्रत्येक आठांपैकीं तीन कनेडिअन त्यांच्या चरितार्थासाठीं परराष्ट्रीय व्यापारावर अवलंबून असतात. त्यामुळें, कनेडिअन बँकांना परराष्ट्रीय व्यापाराकडे लक्ष द्यावेंच लागतें, आणि जागतिक बाजारपेठांची सूक्ष्म पहाणी करावी लागते. कॅनडांतील अगदीं काना–कोपऱ्यांतून बँकांनीं शाखा उघडलेल्या आहेत. १८६८ मध्यें कनेडिअन बँकांच्या एकूण १२३ शाखा होत्या. १९०२ मध्यें त्या ७४७ झाल्या. १९४५ मध्यें त्यांची संख्या ३,१०६ झाली, त्यांत त्यानंतर ७१० ची भर पडली आहे.

कॅनडांतील १० बँकांपैकीं ३ बँका अमेरिकेंतील पहिल्या १५ बँकांच्या यादींत बसूं शकतील, एवढ्या मोठ्या आकाराच्या आहेत. कनेडिअन बँका फक्त खेळतें भांडवल पुरवितात; लहान मुदतीचीं कर्जें देतात. एक वर्षापेक्षा ज्यास्त मुदतीचीं कर्जें त्या देत नाहींत. गहाणाचे तारणावर कर्जें देण्यास त्यांना बंदी असल्यामुळें त्यांचेकडील ठेवी दीर्घकालीन कर्जांत गुंतून पडूं शकत नाहींत. मॉर्टगेज, ट्रस्ट आणि विमा कंपन्या ह्या दीर्घकालीन कर्जांची गरज भागवितात.

कॅनडामधील बँकिंगचीं वैशिष्ट्यें व तेथील बँकांची कार्यपद्धति ह्यांचें थोडक्यांत वर्णन येथें केलें आहे. कॅनडांत अगदीं थोड्या बँका असून त्यांच्या शाखांचें जाळें देशभर पसरलें आहे आणि शाखांच्या मार्फतच तेथील बँकिंगचे सर्व व्यवहार चालू आहेत. भारतांत कोण या प्रकारची बँकिंगची पद्धति असावी, ह्या विषयाच्या चर्चेस कॅनडांतील बँकांची माहिती उपयुक्त होईल. पद्धतीपेक्षा कार्यक्षमता अधिक महत्त्वाची असते; कोठल्याहि पद्धतीचें केवळ अनुकरण करून स्वस्थ बसून चालणार नाहीं एवढें मात्र निश्चित.

---

### बँकिंग प्रदर्शनाचा अहवाल

पुणें येथें नुकत्याच भरलेल्या बँकिंग प्रदर्शनाचा अहवाल पूना बँकिंग असोसिएशननें प्रसिद्ध केला आहे. त्यांत प्रदर्शनाची संपूर्ण माहिती देण्यांत आली असून चित्रांच्या योगानें ती अधिकच उद्बोधक व आकर्षक झाली आहे. प्रदर्शन पाहून गेलेल्या बँकर्सचे व तज्ज्ञांचे अभिप्राय दिले आहेत, त्यावरून व शेठ प्राणलाल देवकरण नानजी ह्यांनीं स्वयंस्फूर्तीनें दिलेल्या २५१ रुपयांच्या देणगीवरून प्रदर्शनाचें महत्त्व ज्यांनीं तें पाहिलें नाहीं, त्यांस सहज पटण्याजोगें आहे. डॉ. पाणंदीकर व श्री. सावकार ह्यांच्या व्याख्यानांचा विस्तृत सारांश प्रस्तुत अहवालांत देण्यांत आला आहे आणि अखेर बँकिंगविषयक प्रश्नांची श्री. वर्दे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं जी चर्चा झाली तिचा गोषवारा दिला आहे. अहवालांतील सुमारें १२ चित्रांमुळें व सुबक मांडणी आणि छपाई ह्यांमुळें तो अत्यंत उठावदार झाला आहे.

प्रदर्शनाच्या उद्घाटनाचे प्रसंगीं "बँका—काल, आज व उद्यां" हा श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं संपादन केलेल्या पुस्तकाचें प्रकाशन जाहीर करण्यांत आलें. जॉइंट स्टॉक, त्याचप्रमाणें सहकारी बँकांविषयीं त्यांत अत्यंत उपयुक्त व ताजी माहिती देण्यांत आली असून उद्यांच्या बँकिंगची दिशा दाखविणारा एक विस्तृत लेखहि त्यांत दिलेला आहे. बँकांचे चालक व बँकांत काम करणारे अधिकारी व नोकर ह्या सर्वांस प्रस्तुत पुस्तक मार्गदर्शक होणार आहे. त्याच्या कांहीं प्रती अद्याप शिल्लक आहेत. त्या प्रत्येकी १ रु. ८ आ. ह्या दरानें बँकांस मिळूं शकतील. पुणें बँकिंग असोसिएशनच्या कार्यासहि त्या पुस्तकाच्या विक्रीमुळें महत्त्वाची मदत होईल. बँकांच्या प्रगतींत व कारभारांत लक्ष घालणारांनीं ह्या पुस्तकाचें जरूर वाचन व मनन करावें; त्यामुळें बँकिंगच्या योग्य प्रकारच्या वाढीस सहाय्य होणार आहे.

---

### "हिंदफिन"ची प्रगति

हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इन्व्हेस्टमेंट लि. ची प्रगति तिचे मॅनेजिंग एजंटस् 'भोसुले, औति आणि कं. च्या नेतृत्वाखालीं होत आहे. कंपनीनें नागपूर शहरांत एक शाखा उघडली असून अमरावतीसहि शाखा उघडण्याचा कंपनीचा विचार आहे. ३१ डिसेंबर, १९५२ अखेरच्या सहामाहींत कंपनीस ३,०११ रु. १२ आ. ९ पै नफा झाला, असें समजतें. ४१,९७५ रु. वसूल भांडवलावर हा नफा झालेला आहे. कंपनीचें खेळतें भांडवल १,८६,१६४ रुपये झालें आहे. तिनें मुख्यतः भक्कम तारणावरच कर्जें दिलेलीं आहेत. कंपनीच्या सोईचा फायदा अधिकाधिक लोक घेऊं लागले आहेत, आणि तिचा भविष्य-सहाय्यक-निधिहि वाढीस लागला आहे.

### साबणाच्या धंद्यांतील अडचणी

गेल्या कांहीं महिन्यांत भारतामधील सर्वच धंद्यांवर मंदीची अवकळा पसरली आहे. अर्थात् साबणाचा धंदाहि ह्या गोष्टीला अपवाद नाहीं. कापडाच्या मोठ्या गिरण्या आणि हातमाग ह्या दोन धंद्यांत ज्याप्रमाणें विरोध उत्पन्न झाला आहे, त्याचप्रमाणें साबणाचे मोठे कारखानदार व ग्रामोद्योगाच्या स्वरूपांत असलेले छोटे कारखाने ह्यांच्यांतहि झाला आहे. फरक एवढाच कीं, हातमागाच्या धंद्याला अंशतः तारण्यासाठी मध्यवर्ती सरकारला हस्तक्षेप करावा लागला. साबणाच्या बाबतींत मात्र छोट्या कारखानदारांच्या स्पर्धेपुढें बडे कारखानदार टेकीला आले आहेत, असें समजतें. छोटे ग्रामोद्योगी साबणाचे कारखाने देशभर सर्वत्र विखुरलेले आहेत. त्यांच्या स्पर्धेचा परिणाम होऊन साबणाच्या सर्व बड्या कारखानदारांनीं आपल्या मालाचे भाव ६॥ ते १० टक्क्यापर्यंत उतरविले आहेत. सामान्यपणें अशी समजूत प्रचलित आहे कीं कोणताहि धंदा मोठ्या प्रमाणावर केला कीं त्यांत तयार होणारा माल चांगल्या प्रतीचा आणि स्वस्त असतो. परंतु निदान साबणाच्या बाबतींत तरी अनुभव उलटा आलेला आहे. छोट्या कारखान्यांतून तयार झालेला साबण बराच स्वस्त तर असतोच आणि कांहीं विशिष्ट प्रकारचा साबण तर कांहीं मोठ्या कारखान्यांतून तयार झालेल्या मालापेक्षा चांगल्या दर्जाचाहि असू असतो. त्यामुळें ह्या कारखानदारांना मोठ्या कारखान्यांशीं टक्कर देणें आतां शक्य झालेलें आहे. लहान कारखान्यांना आणखीहि एक अनुकूलता आहे. ज्या भागांत हे कारखाने असतात त्याच्या आसपासच्या भागांत त्यांचा माल सहज खपून जातो. माल खपविण्याची अडचण त्यांना फारशी भासत नाहीं. मोठ्या कारखान्यांचें मात्र तसें नाहीं. त्यांना आपला माल खपविण्यासाठी दूरदूरच्या बाजारपेठासुद्धा धुंडाळाव्या लागतात. कारण, त्यांचें उत्पादन अवाढव्य प्रमाणावर असल्यानें नजीक असलेल्या बाजारपेठा सर्वच उत्पादन जिरवूं शकत नाहींत. दूरच्या बाजारपेठांत माल खपवावयाचा म्हणजे वाहतुकीचा व इतर आनुषंगिक खर्च हा येतोच. परिणाम असा होतो कीं त्यांच्या मालाच्या विक्रीच्या किंमती तितक्या प्रमाणांत वाढतात; तसें छोट्या कारखानदारांचें होत नाहीं.

---

### महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक तंबाखू परिषद

महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील तंबाखू व्यापाऱ्यांची परिषद कोल्हापूर जिल्ह्यांतील जयसिंगपूर या ठिकाणीं ११ जानेवारी रोजीं भरली होती. तंबाखूची सध्याची कर-पद्धति विषम असल्यामुळें तंबाखू उत्पादक व व्यापारी यांचें नुकसान होतें. म्हणून निरनिराळ्या तऱ्हेच्या तंबाखूवर (घस सेरीज) एकच कर (Flat rate) कसा बसवितां येईल व सरकारी उत्पन्नांतहि त्यामुळें तूट न येईल अशी व्यवस्था कशी करतां येईल, याचा विचार करण्यासाठी मुख्यतः ही परिषद भरली होती. ही परिषद जयसिंगपूर मर्चंट्स् असोसिएशनतर्फे भरविण्यांत आली. बाँबे टोबॅको मर्चंट्स असोसिएशनचे प्रेसिडेंट श्री. हसनअली सालेमहंमद हे अध्यक्षस्थानीं होते.

---

**लग्न केव्हां करावें?**—स्त्री-पुरुषांच्या विवाहाचें योग्य वय काय असावें ह्या प्रश्नासंबंधीं ऑस्ट्रेलियांत लोकमत अजमावण्यांत आलें आहे. लोकमतानें असा निर्णय दिला कीं, पुरुषांनीं २५ वर्षांचे झाल्यावर आणि स्त्रियांनीं २३ वर्षांचे झाल्यावर विवाह करावा.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. वा. वाळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—पुणें शहर—
लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

मोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**एक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यासेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# राष्ट्राच्या जीवनांत व सुखसमृद्धींत मध्यमवर्गीयांचें महत्तम व निर्णायक स्थान.

## नवसमाजाच्या निर्मितीचे वेळीं दिलेला योग्य इषारा

( लेखक:-- श्री. बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., सांगली. )

मध्यमवर्गीय जनता ही प्रायः बुद्धिवान व ज्ञानवान् असते. बुद्धिवान् लोकांचा जन्म प्रायः मध्यम वर्गीयांत होतो.

शारीरिक श्रम करणाऱ्या वर्गात जन्म घेऊन आपल्या बुद्धीच्या जोरावर मध्यम वर्गीयांत समावेश

सुप्रसिद्ध "कॉमर्स" वृत्तपत्राच्या १९५२ सालच्या वार्षिक अंकांत दुष्काळ निवारक समितीचे अध्यक्ष सर राममूर्ति आय. सी. एस्. यांचा "The Role of the middle class in India important for life and growth of the nation" या मथळ्याखाली अत्यंत उद्बोधक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखाचा हा स्वैर अनुवाद आहे. स्वैर अनुवाद करूनहि त्या लेखांत व्यक्त केलेल्या विचारांची यथातथ्य ओळख करून देतांना प्रस्तुत लेखकानें त्या विचारसरणीचा आपल्या परीनें विस्तार केला आहे. तथापि मूळ लेख वाचावा अशी त्याची विनंती आहे.

करून घेणारे महाभाग नाहींत असें नाहीं.

परंतु शारीरिक श्रमाला कार्यप्रवृत्त करून उत्कर्ष घडवून आणणारी बुद्धि व ज्ञान तेथें असतें त्यामुळें हें सीमोल्लंघन घडलेलें असतें.

भारत व पाश्चिमात्य लोकशाहा राष्ट्रांत संपत्ति व शारीरबळ यापेक्षा बुद्धीला व ज्ञानाला महत्त्वाचें व मानाचें स्थान दिलें जातें व तें सर्वतोपरी योग्यहि आहे. कम्युनिस्ट राजवटीच्या सुरुवातीस रशियांत शारीरश्रमाला मानाचें स्थान दिलें गेलें. बुद्धिजीवी लोकांचा कोंडमारा झाला. या धोरणाचा कटु अनुभव येऊं लागल्यानें तेथें शारीरिक श्रम करणाऱ्या बरोबरचें स्थान बुद्धिजीवी लोकांना देण्यांत येऊं लागलें आहे. आजच्या रशियांत शारीरिक श्रम करणारे व बुद्धिजीवी यांचा एक वर्ग व श्रेष्ठतम संशोधक, राजकारणी मुत्सद्दी इत्यादिकांचा एक असे दोनच वर्ग राहिले आहेत. भारतादि लोकशाही राजवटींत शारीरिक श्रमिक, बुद्धिजीवी व श्रेष्ठतम संशोधकादिक, असे तीन वर्ग नांदत आहेत.

शारीरसामर्थ्यावर मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षां ज्ञान व बुद्धि यांच्या जोरावर मिळणारा मोबदला अधिक असे. या दोन वर्गांच्या मिळकतींत २०-२५ वर्षांमागें महदंतर व तीव्र विषमता होती. परंतु गेल्या कांहीं वर्षांत या विषमतेची तीव्रता कमी कमी होत आली आहे असेंच नाहींतर कसबी कामगार, गवंडी व सुतारादि अंगमेहनत करणाऱ्यांची प्राप्ति शिक्षणखात्यांतील नोकर, कारकुनी पेशांतील नोकर, खाजगी नोकर व सामान्य व्यापारी यांच्या प्राप्तीपेक्षा अधिकच असल्याचा अनुभव येत आहे. कसबी कारागीर व सुतारादि अंगमेहनत करणाऱ्या कुटुंबांतील अनेक लोक कमी-अधिक राबून संसार सुखाचा करण्यास मदत करितात. पांढरपेशा वर्गात एकानें राबावें व इतरांनीं खावें असा प्रघातच पडला असल्यानें कसबी कारागिरादिकांचा संसार सुखाचा असल्याचें दृश्य पहावयास मिळत आहे. जीवनवेतनाची किमान मर्यादा, विमा, प्राव्हिडंड फंड, मोफत औषध, हक्काची रजा व बोनसादि अनेकविध सोयीमुळें कामगार व बुद्धिजीवी वर्ग यांच्या प्राप्तींत फरक असल्याची निश्चित खूण दाखविण्यास आतां जागा राहिलेली नाहीं असें म्हणतां येईल.

चातुर्वर्णाऐवजीं आतां तीन वर्ण राहिले असून पूर्वीच्या नांवांतहि बदल झाला आहे. जन्मजात श्रेष्ठ-कनिष्ठ ही कोंडी फुटली आहे. संपत्तीचा महिमा कमी झाला आहे. श्रीपेक्षा सरस्वतींची पूजा होत आहे. कम्युनिस्ट विचारसरणींत समाजाचे दोन भाग पडले आहेत. लोकशाही राजवटींत समाजाचे तीन भाग पडले आहेत, असें स्थूलमानानें मानण्यास हरकत नाहीं. यापैकीं कोणती समाजरचना स्वीकारार्ह व कोणती त्याज्य आहे, हें ठरविण्यांत खरा शहाणपणा, खरी मुत्सद्देगिरी व खरें तारतम्य आहे. हा शहाणपणा व ही मुत्सद्देगिरी न राहील तर कम्युनिस्ट विचारसरणीला दोष देऊन तिला पायबंद घालण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यांत स्वारस्य तरी कोणतें ? भारतांतील समाजाची मनोवृत्ति कळत वा न कळत शारीरिक कामाला अवास्तव महत्त्व देऊन मध्यमवर्ग नष्ट करण्याच्या दिशेनें हळुहळु व गोगलगायीच्या पावलानें कां होईना, वाढत जात आहे असें दिसतें. या मनोवृत्तीला हरणांच्या पावलांचा वेग येणारच नाहीं असें नाहीं. गाडी चालू झाली म्हणजे सुरुवातीपेक्षा वेग वाढत जातो व ती घसरणीला लागली म्हणजे वेग आवरतहि नाहीं.

### धार्मिक विचारसरणी

मानवी देहांत मन व आत्मा यांचें वास्तव्य आहे असें धार्मिक दृष्ट्या मानलें जातें. रशियादि कम्युनिस्ट विचारसरणीच्या राष्ट्रांना ही धार्मिक दृष्टि मान्य नाहीं; कारण कम्युनिस्ट विचारसरणींत आत्म्याला स्थान नाहीं. तेथें आत्म्याचें अस्तित्वच मानलें जात नाहीं. आत्मा, परमात्मा व देव यांचें अस्तित्व कम्युनिस्टांना मान्य नाहीं. धर्म म्हणजे एक प्रकारचा कैफ आहे. या कैफांत समाजाला ठेवण्याची व धार्मिक बंधनें पाळण्याची कम्युनिस्टांना जरूरी भासत नाहीं. गायीला आत्मा नाहीं असें सोयीसाठीं म्हटलें असलें तरी मानवी देहांत आत्मा आहे, ही गोष्ट पाश्चिमात्य लोकशाहीला व भारताला मान्य आहे. शरीर, मन व आत्मा मिळून समाजपुरुष होतो. शरीर व आत्मा या दोहोंमधील पायरी म्हणजे मन. शरीर, मन व आत्मा यांच्या क्रिया व गुणधर्म निरनिराळे व भिन्न भिन्न आहेत. आत्मा अविनाशी आहे. शरीर विनाशी आहे. समाजाच्या दैनंदिन घडामोडींत आत्म्याच्या गुणाचा प्रभाव पडल्याचें दृश्य प्रत्यक्षपणें अनुभवास येत नाहीं. आत्मा अदेह असल्यानें त्याचें अस्तित्वच भासतें नाहीं. आत्म्याचें अस्तित्व व त्याचा विकास हें मानणें अगर न मानणें केवळ धर्माधिष्ठित श्रद्धेवर अवलंबून आहे.

### मनाचें-बुद्धीचें महत्त्व

देह, मन व आत्मा यांत मनाला मध्यबिंदूचें स्थान दिलें आहे. मन हीं प्रेरक शक्ति आहे. मन शरीराला कार्यप्रवृत्त करतें. सद्विचारी व सदाचारी मनाच्या वृत्तींत आत्मा निर्मळ व निष्कलंक राहतो व त्याचा विकास होत होत तो परमात्मा होतो. देवपदाला पोंचतो. ही प्रेरक शक्ति जिवंत ठेवूनच नव्हे तर तिचें संवर्धन करून समाज सामर्थ्यवान, बलशाली व कर्तृत्ववान करावयाच्या

कीं बुद्धीला खची करून शारिरिक श्रमाला महत्त्व द्यावयाचें ? ज्ञानं कर्मबुद्धि यापेक्षा शरीरश्रमाला महत्त्व द्यावयाचें झाल्यास भारताच्या समाजरचनेंत आमूलाग्र बदल करावा लागेल तसा बदल करण्याचा प्रयत्न होऊं लागेल तर रशियादि कम्युनिस्ट राजवटींचे व तेथील विचारसरणीचें अनुकरण करावें लागणार आहे. आत्म्याच्या अस्तित्वाचें विस्मरण करावें लागेल. बुद्धीला-ज्ञानाला-प्रेरकशक्तीला-दुय्यम दर्जाचें स्थान दिलें जाऊन शारीरिक श्रमाला अग्रतेचा मान मिळत गेल्यास प्रेरक शक्तीचा विकास न होता ती खुरटी होत होत शेवटीं नष्ट होईल.

## मध्यमवर्गीयांचें समाजांतील कार्य

मध्यमवर्गीयांच्या बुद्धिमत्तेवर व ज्ञानावर समाजाची घडण व रचना अवलंबून असते. मध्यमवर्गीय जनता उदासीन व निराशी झाली व हात राहील तर समाजाची वाढ खुंटते. समाज उदास होतो. समाजांतील चैतन्य व उत्साह नष्ट होतो. दुर्दम्य उत्साही व आशावादी राज्यकर्त्यांनाहि आपणांस जनतेचा पाठिंबा मिळत नाहीं, असे निराशेचे उद्गार वारंवार काढावे लागतात.

पंचवार्षिक योजना, ग्रामविकास योजना व दुष्काळ-निवारण कार्य या कल्याणकारी कार्याला जनतेच्या सहकार्याची जरूरी आहे. या योजना यशस्वी होण्यासाठी पैशाचा पुरवठा होऊनहि जनतेच्या सहकार्याचा अपेक्षेप्रमाणें लाभ न मिळेल व जनतेंत उत्साह उत्पन्न न होईल तर या योजना यशस्वी होण्याची फारशी अपेक्षा नाहीं. घरीं चालून आलेल्या लक्ष्मीला दार उघडून आंत घेण्याचें शहाणपण तरी दाखवावयास नको ? या योजना कल्याणकारी आहेत म्हणून जनता उत्साहानें त्यांत भाग घेईल ही अपेक्षा अनाठायी आहे. अशा योजनांचें महत्त्व आजवर मध्यम-वर्गीय बुद्धिमान लोकच जनतेला सांगत आले आहेत. योजना समितीचे दूरदृष्टी सभासद व सरकारी नोकर यांचा आवाज समाजाच्या खालच्या थरापर्यंत नेऊन पोंचविण्याचें व जनतेंत उत्साह व चैतन्य निर्माण करण्याचें कार्य मध्यमवर्गीयांचें आहे. कांहीं थोर अपवाद वगळल्यास मध्यमवर्गीय बुद्धिवान् समाजांत अनास्थाच पसरली आहे. तो उदासीन आहे. ही लोकशाही राजवट असतां या राज्यकारभारांत आपल्याला स्थान नाहीं, आपल्या गुणाला अवसर मिळत नाहीं, असें त्याला वाटतें. राष्ट्रहितासाठीं मध्यमवर्गीय बुद्धिजीवी लोकांचें स्थान अबाधित ठेवून त्याच्या अंगी असलेल्या गुणधर्मांचा विकास होण्यास संधि देणें जरूर आहे. समाजरचनेंतील हा एक महत्त्वाचा दुवा आहे.

शरीराला दृष्टि आहे पण बुद्धीला दूरदृष्टि आहे. शरीरबळावर उत्पादनांत वाढ होते पण बुद्धिमान् वर्ग या उत्पादनवाढीच्या क्रियेंतच भविष्यकाळासाठीं अधिक उत्पादन करण्याच्या शक्तीचें व युक्तीचें बीजारोपण करीत असतो. खर्च वजा जातां शिलकी टाकलेल्या संपत्तींतून हा वर्ग भांडवल व ज्ञान उभारीत असतो. ही भांडवलवाढ व हा ज्ञानसंग्रह शारीरिक श्रम करणा-ऱ्यांच्या उत्कर्षाला अधिकाधिक संधि देतो.

व्यवस्थित कारभार मग तो राज्याचा असो, कारखान्याचा असो, दुकानदारीचा असो, घरप्रपंचाचा असो वा अन्य कोण-त्याहि प्रकारचा आणि व्यवहाराचा असो, सर्वच प्रकारचें उत्पादन व संघटनाचातुर्य, इत्यादि राष्ट्रहिताच्या अनेकविध कार्यांत मध्यमवर्गीय बुद्धिमान् जनता राबत असते. जनतेचें शिक्षण व आरोग्य यांची जबाबदारी मध्यमवर्गीय बुद्धिजीवी वर्गावर अवलंबून नाहीं काय ? बुद्धिवान् लोकांच्या कल्पनेंतून तयार झालेल्या यंत्रांनीं शरीरश्रम करणाऱ्यांचा श्रमभार हलका करून त्यांच्या सुखांत भर घातली नाहीं ?

समाजाच्या एकंदर दैनंदिन व्यवहाराकडे थोड्याशा बारका-ईनें पाहिल्यास असें दिसून येईल कीं मोटारीला गति देण्यासाठीं जसें पेट्रोल, आगगाडीला धावतां येण्यासाठीं कोळसा अगर वीज अगर बैलगाडीला कार्यक्षम करण्यासाठीं बैल यांची जरूरी असते तद्वतच समाजाला कार्यप्रवण करण्यासाठीं समाजांत चैतन्य व जीव भरण्यासाठी आणि राष्ट्र समृद्ध व संपन्न करण्यासाठीं मध्यमवर्गाच्या बुद्धीची व ज्ञानाची राष्ट्राला जरूरी आहे. सामान्य माणसाच्या डोळ्याला जें दिसत नाहीं तें बुद्धिवंताच्या दिव्य व दूरदृष्टि दृष्टीला तें दिसतें. कोळशापासून पेट्रोल, शेंगदाण्यापासून दूध, व कृत्रिम तांदूळ बुद्धिमान तयार करितो. चंचल विजेला बुद्धिवंतांनीं आपली दासी बनविली आहे. बेफाम निसर्गावरहि बुद्धि-वंतांनीं आपलें प्रभुत्व गाजविलें आहे. केवळ ४८ तासांत पृथ्वीप्रदक्षणा इत्यादिक शक्य कोटींत कोणी आणिल्या ?

यावरून समाजाच्या अगर राष्ट्राच्या समृद्धींत व संपन्नतेंत शरीरश्रमाची गरजच नाहीं असें मात्र मुळींच नाहीं. पोट आणि अवयव यांच्यांतील तक्रारीचा विचार करून दिलेला निर्णय न्याय्य असल्याचें मान्य करावें लागणार आहे. तोच निर्णय याहि वादांत मान्य करावा लागेल. सर राममूर्तीचें या बाबतींत निर्णा-यक मत त्यांच्याच भाषेंत देत आहे. "The middle class plays a role of crucial importance in the life and growth of a nation. In redesigning Society care is needed to conserve the values contributed by the middle class."

राष्ट्राच्या जीवनांत व समृद्धींत मध्यमवर्गीयांचें स्थान कुठें आहे, त्याचें महत्त्व किती आहे व या वर्गाच्या मौलिक गुणांचें संरक्षण व संवर्धन करण्याची जरूरी कां आहे, याची महाती सर राममूर्तीनीं केवळ दोन वाक्यांत वर्णिली आहे, याकडे नेत्यांचें लक्ष जाईल अशी आशा आहे.

## राष्ट्राचें बळ आणि लोकसंख्या

मनुष्यबळावर राष्ट्राची ताकद, शक्ति व सामर्थ्य हीं अव-लंबून आहेत. पहिल्या जागतिक युद्धानंतर फ्रान्स व इटली या राष्ट्रांनीं आपली लोकसंख्या वाढविण्यासाठीं अनेक उपाय योजिले होते. ५ कोटी इंग्रज, ६ कोटी जर्मन, इतक्याच लोक-संख्येचा जपान व वरील तीनहि राष्ट्रांतील लोकसंख्या असलेला अमेरिका केवळ लोकसंख्येच्या बळावर प्रबळ ठरलेले नाहींत. या वरील चारहि प्रबल राष्ट्रांच्या एकूण लोकसंख्येपेक्षा भारताची लोकसंख्या अधिक आहे. लोकसंख्येच्या बाबतींत चीन जगांत अद्वितीय आहे. प्रश्न असा कीं, प्रचंड लोकवस्तीच्या भारत व चीनला दुय्यम स्थान कां ? ५-७ कोटी लोकवस्तीच्या जपान व जर्मनीच्या दोस्तीची व सहकार्याची जगांतील प्रबळ राष्ट्रांना भूक कां ? भारत व चीन या राष्ट्रांत मनुष्यबळ अमाप आहे पण या शक्तीला युक्तीची जोड नाहीं. या प्रचंड शक्तीला शास्त्रशुद्ध व्यवस्था लावणाऱ्या मध्यमवर्गीय बुद्धि-वंतांची तूट आहे. नदीनाल्यांच्या पात्रांतून पाण्याचा प्रचंड प्रवाह वाहत आहे पण तें पाणी अडवून त्याचे अनेकविध उपयोग करून घेऊन त्याला जनतेच्या सेवेस लावणाऱ्यांचा दुष्काळ आहे.

कोळशांतून शक्ति निर्माण करण्याचा शोध स्टीफन्सननें लावण्यापूर्वी हजारों वर्षे कोळसा केवळ मातीमोल होता. भार-

त्याच्या पोटांत, जंगलांत व पर्वतावर अपार संपत्ति आहे. ही संपत्ति निर्माण करण्यास विधात्याला जेवढे श्रम, सायास व बुद्धि खर्चावी लागली त्यापेक्षा अनेकपट श्रम, सायास व शक्ति मानव निर्माण करण्यांत विधात्याला खर्चावी लागली आहे. मानव निर्माण करण्यांत विधात्याची सर्व शक्ति खर्च पडली आहे. विधात्यानें खर्चेलेल्या शक्तीसामर्थ्याचा संग्रह मानवी देहांत झाला आहे. वीज, ॲटम बॉंब अगर हायड्रोजन बॉंब यांत जी विध्वंसक अगर विधायक शक्ति आहे, तिचा कर्ता करविता बुद्धिजीवी मानव आहे. इंग्लंड, जर्मनी व जपान ही राष्ट्रें केवळ लोकसंख्येच्या बळावर प्रबळ झाली नाहींत. तेथील बुद्धिवंतांनीं त्यांना सामर्थ्यशाली बनविलें आहे.

### शक्ति व सामर्थ्याची जननी

शक्ति व सामर्थ्य यांची जननी म्हणजे मन-बुद्धि-ज्ञान. शरीरश्रमांतून शक्ति व सामर्थ्य यांचा लाभ होतो, हें म्हणणें पूर्ण सत्य नाहीं. राष्ट्रीय जीवनांत व समृद्धींत मध्यमवर्गीय बुद्धिवंतांचें स्थान श्रेष्ठ व निर्णायक आहे. यासाठीं नवसमाज निर्माण करितांना राष्ट्रकार्याला उपयुक्त व अपरिहार्य असलेल्या मध्यमवर्गीयांच्या मौलिक गुणांचें संरक्षण व संवर्धन करण्याची दक्षता घेणें जरूर आहे. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं याच महत्त्वाच्या गुणाकडे नवसमाज निर्माण करणाऱ्या नेत्यांचें दुर्लक्ष होत आहे, अशा तक्रारीस भरपूर अवकाश आहे. अशी परिस्थिति नसती तर सर राममूर्ती सारख्या विचारी, बहुश्रुत व राजकारणी लेखकाला इशारा देण्याची जरूरीच निर्माण झाली नसती. भारताच्या अमाप लोकसंख्येंत बुद्धिवंतांचा मुळांतच तुटवडा आहे. अशा विकट व प्रतिकूल परिस्थितींत आजचेंच धोरण या पुढें चालूं राहून शरीरश्रमाला वाजवीपेक्षां फाजील महत्त्व दिलें जाईल तर कम्युनिष्ट ध्येयवादाला व विचारसरणीला कळत वा न कळत का होईना प्राधान्य दिलें जात आहे असें घडणार आहे. कम्युनिस्ट चळवळीच्या प्रचाराला व प्रसाराला तोड म्हणून योजलेली औषधयोजना कम्युनिस्टांना मारक विष न ठरतां ती अमृतसंजीवनीच ठरेल. आजची नवसमाजरचना ही कम्युनिस्ट ध्येयवादाला आव्हान नसून तें आमंत्रणच ठरणार कीं काय?

---

### कापडाच्या उत्पादनाचा नवा उच्चांक

आपली कापडाची जवळजवळ सर्व गरज पुरी करणारा आपला कापड धंदा हा देशांतील सर्वांत मोठा धंदा असून त्यांत १०० कोटी रुपयांवर भांडवल गुंतलेलें आहे. या धंद्यांत सुमारें ११० लक्ष चात्या आणि अंदाजें २ लक्ष माग चालू असून दरवर्षी सुमारें ४७१ कोटी वार कापड आणि १६७ कोटी पौंड सूत उत्पादन करण्याची त्याची शक्ति आहे. संपूर्ण कार्यशक्तीइतकें उत्पादन काढण्यासाठी आपल्या कापड गिरण्यांना ४२ लक्ष गांसड्या कापूस पुरविला पाहिजे. भारतीय कापडधंद्यानें १९५२ मध्यें ४६० कोटी वार कापड आणि १४५ पौंड सूत यांचें उत्पादन करून त्याबाबत नवीन उच्चांक प्रस्थापित केला. सुताच्या पुरवठ्यांत वाढ केल्यानें १९५२ मध्यें हातमागाच्या धंद्यानें १०० कोटी वार कापड तयार केलें असावें असा अंदाज आहे. १९५० व १९५१ मधील हेच आंकडे अनुक्रमें ६३ कोटी व ८० कोटी वार होते.

---

**पोलिओवर औषध सांपडलें**—पोलिओ ह्या रोगावर एक परिणामकारक लस अमेरिकन डॉक्टरांनीं शोधून काढली आहे, असें समजतें ह्या शोधाची माहिती औपचारिक रीत्या लवकरच जाहीर करण्यांत येणार आहे. हा रोग विशेषतः मोठ्या शहरांतील लहान मुलांना होतो असें आढळून आलें आहे.


# NOTICE

**THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED.**

Notice is hereby given that the Eighteenth Ordinary General Meeting of the Share-holders of the Bank of Maharashtra, Ltd. will be held in the Bank's new building under construction at 898 Sadashiv Peth, Poona City on Sunday, the 1st March, 1953 at 4 P. M. (S. T.) to transact the following business :—

1 To receive and consider the Balance Sheet, the Profit & Loss Account and the Reports of the Directors and of the Auditors for the year ended on 31st December, 1952.

*2 To declare a Dividend.

3 To elect three Directors in the places of the retiring Directors who are eligible for re-election.

4 To appoint Auditors and to fix their remuneration.

5 To transact such other business as may be allowed by the Chairman.

Poona City, 25 January, 1953 } By order of the Board, C. V. JOAG, Manager.

*N. B.* :—The Share Transfer Books of the Bank will be closed from the 24th day of February, 1953 to the 4th day of March, 1953, both days inclusive.

---

*** The Dividend, when declared, will be payable on and after Saturday, the 27th March, 1953 and the Dividend Warrants will be posted to the registered addresses of the Share-holders.** ***Change of address, if any, should immediately be communicated to the Bank.***

---

## Bank of Maharashtra Ltd., Poona 2.

Applications are invited for the posts of Junior Officer from persons who are graduates in Commerce or Economics and who have previous experience in Banking of at least Five Years. Salary according to qualification.

POONA—2. 30-1-1953. } C. V. JOAG, Manager.


---

**विजेच्या मीटर्सचें उत्पादन**—बंगलोर येथील इलेक्ट्रिकल मॅन्युफॅक्चरिंग कंपनी घरांत लागणारे विजेचे मीटर्स तयार करण्याची खटपट करीत आहे. कंपनीनें एका जपानी कंपनीचें साह्य मिळविलें असून भारतीय सरकारची मंजुरीहि मिळविली आहे. कंपनीला भांडवल म्हैसूर सरकारनें पुरविलें आहे. गेल्या ऑगस्टपासून कंपनीनें १०,००० मीटर्स तयार केले व ते भारतीय सरकारनें अलिपूर येथील टेस्ट हौसमध्यें तपासून मंजूर केले.

### विवाहविषयक जाहिराती

"वर पाहिजे" किंवा "वधू पाहिजे" अशा जाहिराती हिंदी वृत्तपत्रांतून नेहमीं येतात. नोकरी किंवा व्यवसायानिमित्त लोक आपलीं गांवें सोडून दुसरीकडे जातात त्यामुळें विवाह जमविणें अवघड होऊन बसतें. चांगल्या स्थळांसाठीहि वृत्तपत्रांतून जाहिराती द्याव्या लागतात आणि दलालांच्या संस्थांतून नांवें नोंदवावीं लागतात. "टाइम्स ऑफ इंडिया" सारख्या वृत्तपत्रांत विवाहाच्या जाहिराती पूर्वी छापीत नसत, त्या आतां नित्य येऊं लागल्या आहेत. विवाहाच्या जाहिरातींबद्दल परदेशी पत्रकारांची वृत्ति हेटाळणीची असे. ग्रेट ब्रिटनमधील वृत्तपत्रांतून अशा जाहिराती येत नाहींत, अशी आपली समजूत मात्र चुकीची आहे. मोठ्या वृत्तपत्रांत विवाहाच्या जाहिराती स्वीकारल्या जात नसल्या तरी तेथील सुमारें १,००० प्रांतिक वृत्तपत्रांत त्या नेहमीं प्रसिद्ध होत असतात. ग्रेट ब्रिटनमध्यें विवाह जमवून देणाऱ्या संस्थाहि कमी नाहींत. लंडनमधील अशा पांच संस्थाकरवीं दर आठवड्यास दोन-तीन विवाह घडवून आणले जातात आणि त्यांची फी ७५ ते १५० रु. असते. बहुतेक पुरुषांना घरीं राहून संसार करणाऱ्या स्त्रिया हव्या असतात; पुरुष शिक्षकांना स्त्री-शिक्षक पत्नी म्हणून नको असतात, असा त्या संस्थांचा अनुभव आहे. पत्नीची निवड करतांना पुरुषांची तिच्या पैशावर नजर असते, म्हणून स्त्रीचें उत्पन्न किंवा तिच्याजवळील पैसा ह्यांची आगाऊ माहिती पुरुषांना न पुरविण्याची तेथील विवाह संस्थांची पद्धति आहे. आपल्याकडील हुंड्याची पद्धत अनिष्ट आहे, हें तर खरेंच; परंतु ग्रेट ब्रिटनमध्येंहि जे विवाह येथील पद्धतीप्रमाणेंच जुळवले जातात, त्या बाबतींत वेगळ्या प्रकारानें कां होईना, पैशाची अपेक्षा केली जातेच, असें दिसून येतें.

### बायको, गाडी का दोन्ही?

दि ऑटोमोबाइल मॅगेझिन ऑफ इंडियानें गेल्या महिन्याच्या अंकांत, मासिकाच्या वाचकांस एक प्रश्न विचारून त्याचें उत्तर देण्यास सांगितलें होतें. तो प्रश्न असा:— तुमच्या घरच्या स्त्रियांपैकीं कोणी मोटार चालविण्यास शिकण्याची इच्छा व्यक्त केली तर तुम्हीं त्यांना प्रोत्साहन द्याल, कां प्रयत्नपूर्वक त्यांचें बोलणें मोडून काढाल? प्रश्नास उत्तरें पाठविणाऱ्या सर्वांनीं, एकमतानें, स्त्रियांना मोटार ड्रायव्हिंग शिकविण्यास नकार दिला आहे. घरच्या मंडळींना मोटार ड्रायव्हिंग आलें, तर अडीअडचणीचे वेळीं तें फार उपयोगी पडेल, ह्याविषयीं त्या सर्वांचें एकमत असूनहि, त्या मंडळींना मोटार चालविता यावी असें मात्र त्यांना वाटत नाहीं! शिवाजीनगर, पुणें येथील श्री. व्ही. व्ही. एल. ("अर्था"च्या परिचयाचे, वा. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.) ह्यांना त्यांच्या उत्तराबद्दल पहिलें बक्षिस देण्यांत आलें आहे, तें येथें उद्धृत करण्यांत येत आहे:—

त्यांचा हट्ट मोडून काढा?

कां?

कारण, माझी बायको आणि माझी गाडी, दोन्ही एकदम गमावण्यास मी तयार नाहीं!

---

**हातमागासाठी बोर्ड**—उत्तर प्रदेश सरकारनें हातमागाच्या व्यवसायाचा विकास करण्यासाठी एक बोर्ड स्थापन केलें आहे. त्यावर ६ सरकारी अधिकारी आणि १५ बिन-सरकारी सभासद असतील. बोर्डाच्या बैठकी दर दोन महिन्यांनीं होणार असून हातमागाच्या धंद्यासंबंधीं सरकारला सूचना देण्याचें काम त्यानें करावयाचें आहे.

### भारताचा चहा अमेरिकेंत विकण्याची सोय

भारतीय सरकार आणि अमेरिकेंतील चहाचे व्यापारी ह्यांच्या दरम्यान एक करार झाला असून भारतीय चहा अमेरिकेंत विकण्याची सोय करण्यांत आली आहे. अमेरिकेच्या व्यापाऱ्यांनीं चहा लोकप्रिय करण्यासाठीं १५ लाख डॉलर्सचा खर्च प्रचारावर करण्याचें ठरविलें आहे. चहा निर्यात करण्यांत भारताशिवाय सिलोन आणि इंडोनेशिआ हे देशहि सामील आहेत. प्रचारासाठीं होणाऱ्या खर्चापैकीं निम्मा खर्च भारत करणार असून बाकीचा सिलोन व इंडोनेशिआ सोसणार आहेत. चहाचा प्रचार फक्त भारतीय चहापुरताच रहाणार नाहीं; सर्व देशांच्या चहाच्या मिश्रणासाठीं तो करण्यांत येणार आहे. ही व्यवस्था भारताच्या हिताची आहे असें सांगण्यांत येत आहे. कारण, तसें न केल्यास चहा निर्यात करणाऱ्या वरील राष्ट्रांत फारच जोराची स्पर्धा होईल. उलट, मिश्रणाचा प्रचार केल्यानें भारताची चहाची निर्यात वाढण्याचा संभव आहे. ग्रेटब्रिटनसारख्या चहाची मागणी मोठ्या असलेल्या देशांत चहा निर्यात करणाऱ्या देशांची एक संयुक्त संघटना उभारण्यांत येणार असल्याचें समजतें. द. आफ्रिकेसारख्या कांहीं देशांतून मात्र प्रत्येक राष्ट्र आपआपली स्वतंत्र संघटना स्थापन करणार आहे. चहाच्या निर्यातीनें वरील तिन्ही राष्ट्रांना डॉलर्सची प्राप्ति होईल हें उघडच आहे.

### आयुर्विम्याचें घटत चाललेलें काम

१९५१ मध्यें भारतीय आयुर्विमा कंपन्यांनीं ११६ कोटी, ४६ लक्ष रुपयांचें नवें काम पुरें केलें. ह्याच मुदतींत, विदेशी आयुर्विमा कंपन्यांनीं भारतांत १६ कोटी, ४६ लक्ष रुपयांचें काम मिळविलें. खालील तुलनात्मक आकड्यांवरून विम्याच्या कामाचे आकडे कसे घटत गेले आहेत, तें दिसून येईल.

हिंदी कंपन्यांचें नवें काम

| वर्ष | कोटी रु. |
|---|---|
| १९५१ | ११६·४६ |
| १९५० | ११८·३८ |
| १९४९ | १२३·१३ |

---

**यांत्रिक पद्धतीचा नवा टूथ ब्रश**—दाताच्या ब्रशानें दांत जोरानें घासणें योग्य नाहीं, असें आधुनिक दंतवैद्यांचें मत आहे. त्यांच्या ह्या मतास अनुसरून एक अमेरिकन कल्पकानें लहानशा मोटरच्या साह्यानें उलट-सुलट चालणारा एक ब्रश तयार केला आहे. तो ब्रश वरच्या दांतांवर एका दिशेनें व खालच्या दांतावर विरुद्ध दिशेनें फिरतो. पण हिरड्यांना मात्र स्पर्शही करीत नाहीं. चार्ली चॅपलिनच्या 'मॉडर्न टाइम्स' ह्या बोलपटांत अशा ब्रशाची कल्पना रंगविण्यांत आली होती.

**इराण भाग-भांडवल घेणार**—इराणच्या उत्तरेला असलेल्या कॅस्पिअन समुद्रांत मच्छीमारी करण्याचा हक्क रशिआला मिळालेला होता. ह्या हक्काची मुदत गेल्या जानेवारी अखेर संपली. ज्या रशिअन कंपनीकडे हे अधिकार होते, तिच्या भाग-भांडवलापैकीं ५० टक्के भांडवल इराणचें सरकार विकत घेणार आहे असें समजतें. रशिआचा इराणमधील वकील आणि इराणचे पंतप्रधान डॉ. मुसद्दीक ह्यांच्यामध्यें प्रस्तुत बाबतींत नुकतीच वाटाघाट झाली होती.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.